# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३०.३.२००७ रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

**शुक्रवार दिनांक ३० मार्च २००७** रोजी मा.महापौर डॉ.भागवत किशनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी ०३.३० वाजता **'वंदेमातरम्'** या गिताने सुरू झाली.सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
१०. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
११. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१२. स.स.सौ.आशन्ना लक्ष्मी शंकर
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१६. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१७. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१८. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१९. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२०. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२१. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२२. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२३. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२४. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२५. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
२६. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
२७. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन

२८. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
२९. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३०. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३१. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३२. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३३. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३४. स.स.श्री.खान निसार मो.खान
३५. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
३६. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३७. स.स.सौ.राऊत छाया विलास
३८. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
३९. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४०. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४१. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
४२. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४३. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
४४. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४५. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४६. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
४७. स.स.सौ.रेखा कैलास काथार
४८. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
४९. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५०. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५१. स.स.श्री.खुडे विजय किसन
५२. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५३. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५४. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
५५. स.स.श्री.भगवान देविदासराव घडमोडे
५६. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
५७. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
५८. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
५९. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
६०. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६१. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
६२. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६३. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
६४. स.स.सौ.जैन अल्पा विकास
६५. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन

६६. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस

६७. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव

०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल

०३. स.स.श्री.राजेश व्यास

०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

०५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**विषय क्र. ८०१ :**

सन २००६-२००७ चे सुधारीत व सन २००७-२००८ चे मुळ अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

प्र.मुख्य लेखाधिकारी : सन २००६-२००७ हे सुधारित व सन २००७-२००८ चे मुळ अंदाजपत्रक मा.सभापती,स्थायी समिती हे सर्व साधारण सभेला सादर करणार आहेत. मी त्यांना विनंती करतो की, सभागृहाला अर्थसंकल्प सादर करावा.

श्री रेणूकादास वैद्य : २००६-२००७ चा सुधारीत व २००७-२००८ चा मुळ अंदाजपत्रक मी आपल्यासमोर मांडीत आहे. सर्व स्थायी समिती सभेच्या सदस्यांनी या अर्थसंकल्पाला मंजूरी दिली त्यांची नांवे आपल्यासमोर आहे. या सर्व सदस्यांच्या मान्यतेनुसार हा अर्थसंकल्प सादर करण्यात येत आहे. या वर्षाच्या कालावधीमध्ये स्थायी समितीच्या माध्यमातून जी कामे झालेली आहे त्याचा उल्लेख या ठिकाणी करण्यात येत आहे.

मागील वर्षी ठरविलेल्या प्रमाणे जकातीचे उद्यीष्ट१०२ कोटी पूर्ण करण्यात आलेले आहे. यावर्षी देखील जकातीच्या खाजगी करणाच्या माध्यमातून उद्यीष्ट पूर्ण होईल अशी खात्री आहे. शहरातील अवैध कत्तल बंद करून त्या सर्व व्यावसायीकांना १५२ भूखंड पडेगांव परिसरात दिले आहे. ऐतिहासीक दरवाज्याचे पुर्नरूज्जीवनासाठी आपण त्यांचे नुतनीकरण केले आहे. कांचनवाडी येथील सिलेंडर स्फोट या दुर्देवी घटनातील जखमींना औषधोपचारासाठी आर्थिक व वैद्यकीय मदत देखील केलेली आहे. घाटी रूग्णालयाला २० लाखाचा खाटी पुरविण्याचा निर्णय देखील स्थायी समितीने घेतलेला आहे. सिध्दार्थ उद्यान येथील जुनी खेळणी बदलण्याचा निर्णय देखील स्थायी समितीने घेतलेला आहे. सुशिक्षित बेरोजगारांना अल्प दरात गाळे उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महापालिकेच्या २४००० विद्यार्थ्यांना इंडस्च्या १००० विद्यार्थ्यांना मोफत गणवेष पुरविण्याचा निर्णय घेतलेला आहे. शहरातील ज्येष्ठ नागरीकांना मोफत औषधोपचार पुरविण्याचा निर्णय घेतलेला आहे. गुंठेवारी नियमित करण्यासाठी विशेष मोहिम राबविणे. सभापती आपल्या दारी हे उपक्रम राबविणे इत्यादी निर्णय घेण्यात आला. त्या अंतर्गत ४२७ समस्यांचे निराकरण करण्यात आले. पुंडलिकनगरचा बऱ्याच दिवसापासून प्रलंबित असलेला पाणी प्रश्न २८ फेब्रुवारी २००७ पासून सोडविण्यात आला.

मा.महापौर : सर्व सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आप आपल्या जागेवर बसावे.

श्री रेणूकादास वैद्य : शहरात पर्यावरणातील संतुलनासाठी ५०००० झाडे लावण्यात यावीत. त्याची अंमलबजावणी सुरू आहे. संत एकनाथ रंगमंदिराचे नुतनीकरणाचा निर्णयही स्थायी समितीने घेतला होता. प्रभाग समिती-ड आणि सिडको भागाचे साफसफाईचे खाजगीकरण,शहरातील मोठया १२ रस्त्याचे नुतनीकरण करण्याचा निर्णय स्थायी समितीने घेतला होता. या वर्षी अंर्थसंकल्पातील ठळक वैशीष्टे पुढील प्रमाणे आहे- त्यात ४० कोटीचा निधी विविध विकास कामासाठी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र,मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्राहलय येथे प्रत्येकी ५ लाख रूपयाचे पुस्तके विद्यार्थ्यासाठी उपलब्ध करून देणे. शहरातील रस्त्यांची देखभाल दुरूस्ती,नविन रस्ते, खडी रस्ते,क्राँक्रीट रस्ते,पेव्हींग ब्लॉक व शहर सौंदर्यीकरणासाठी साधारण ४० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी भागासाठी १ कोटीची तरतूद, पुतळे खरेदी करणे व देखभाल करणे यासाठी ४५ लाखाची तरतूद केलेली आहे.पथदिव्यासाठी ४ कोटी, भूमिगत गटारे व जलनि:साहरण वाहिन्या,नाला संरक्षण भिंत दुरूस्ती व नविन कामे यासाठी ९ कोटी रूपयेची तरतूद करण्यात आली आहे. विविध उद्यानाच्या विकासासाठी २.२० कोटी,विविध ठिकाणच्या स्मशानभूमीचे सुशोभिकरण व विकास करणेसाठी ९४ लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली आहे.इमारत देखभाल व दुरूस्ती करणेसाठी १.९० कोटी व भूखंडाच्या संरक्षणासाठी ३ कोटीची तरतूद केलेली आहे. शहरातील स्वच्छतेसाठी व रस्त्यांवर थुंकणाऱ्यावर आळा घालणेसाठी पथक निर्माण करावे अशी विनंती करतो व त्यावर दंडात्मक कार्यवाही व्हावी. जे मालमत्ता कर सतत ३ वर्ष भरतात त्यांना ४ थ्या वर्षी मालमत्ता कराच्या देयरक्मेतून ५%सवलत देणेचा निर्णय घेतला आहे. सिध्दार्थ उद्यान, छत्रपती शिवाजी वस्तू संग्रहालय येथे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

उत्पन्न व खर्चाचा आलेख येणारा रूपया कसा असेल व खर्च कशा पध्दतीने खर्च होईल हे पावर पॉईट प्रेझेंटशनने दाखविण्यात आला आहे.यावर्षीचे महानगरपालिकेचे अर्थसंकल्प सादर करण्याचे भाग्य मला लाभले. (व मा.सभापती स्थायी समिती यांनी सदस्यांचे आभार मानले.)

मा.महापौर : ३१७.७० कोटीचा अर्थासंकल्प सभापती स्थायी समिती श्री रेणूकादास वैद्य यांनी सभेत सादर केला आहे. एक वर्ष त्यांनी विकासासाठी काम केले. वर्षभरात केलेले कामासंबंधी सभागृह नेते श्री संतोषजी खेंडके यांनी विचार मांडावेत. हा अर्थसंकल्प चर्चेसाठी नंतर ठेवला जाईल व त्या सभेची तारीख स्वतंत्ररित्या कळविली जाईल. आता फक्त अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेला ठेवला जाईल.

श्री संतोष खेंडके पाटील : सन २००७-२००८ चा अर्थसंकल्प सभापती स्थायी समिती यांनी सभागृहात हायलाईट केला. तो वर्षभरात जी ठळक कामे केली ते सभागृहासमोर मांडली व पुढील कुठली कुठली कामे करणार आहे ते पण हायलाईट केले. त्याबद्दल त्यांचे मी सभागृहाचे वतीने अभिनंदन करतो.

श्री काशिनाथ कोकाटे : सन २००७-२००८ चा अर्थसंकल्प मा.सभापती व स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी विचार करून अर्थपुर्ण अर्थसंकल्प सादर केला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. विकासात्मक कामासाठी ज्या आवश्यक बाबी आहे त्याचा समावेश

करण्यात आलेला आहे.चांगला अर्थसंकल्प मांडलेला आहे. मा.सभापती यांनी गेल्या १२ महिण्याच्या कालावधीमध्ये गेल्या वर्षीचे अपूर्ण राहिलेल्या कामांना चालना देण्याचे काम केलेले आहे. पुन्हा एकदा मी त्यांचे माझे वतीने अभिनंदन करतो.

श्री मनमोहनसिंग ओबेराय: मा.सभापती स्थायी समिती यांनी आपणाकडून अर्थसंकल्पासाठी प्रयत्न केले मागील वर्षी जो अर्थसंकल्प सादर झाला होता त्यानंतर आज आपण सदर बजेट दुरूस्तीसाठी आमच्याकडे दिलेले आहे. मुळातच अर्थसंकल्पाला तीन महिने अगोदर रिवाईज करायला पाहिजे होते. याबद्दलची माहिती तीन महिण्यापूर्वीच द्यायला पाहिजे होती. नफा नुकसान कोठे होत आहे याबद्दलची माहिती सदस्यांना दिली नाही. प्रशासनाने आणि स्थायी समिती सभापतीने याबाबत देखील प्रयत्न केले नाही. ज्या त्रुटया होत्या ते लपविण्याचा प्रयत्न केला व या त्रुटया दुरूस्त करण्याचे काम झाले नाही. कोणत्या प्रभागात किती काम झाले हे आज समजत नाही यात दुरूस्ती करण्याची संधी मिळाली नाही. २००६-२००७ च्या त्रुटयासंदर्भात बोलत आहे. एकीकडेच काम झालेले आहे दुसरेकडे काम झालेले नाही आमची कामे स्पील ओव्हरमध्ये गेलेली आहे. मी सभापतीच्या विरोधात बोलत नाही कामाची पध्दत दुरूस्त करावी. अर्थसंकल्प तीन महिण्यापूर्वीच सुधारीत करावे. पुढे काय काय काम करायचे ते कळेल. सामान्य बजेट आहे.

श्री सलीम खान : आम्हाला बजेट पुस्तक दिले त्याबद्दल धन्यवाद. पुढच्या सभेत चर्चा करण्यात येईल.

मा.महापौर : आता फक्त अर्थसंकल्प सादर केलेला आहे. या अर्थसंकल्पावर चर्चा करणेसाठी वेगळी सभा आयोजित केली जाईल व त्या दिवशी सर्वांना चर्चेसाठी संधी दिली जाईल.

श्री दत्ताभाऊ पाथ्रीकर : सभापती स्थायी समिती यांनी वर्षभर जे काम केले आहे त्यासंदर्भात मी बोलणार आहे. माझी मा.सभापतीकडून अशी अपेक्षा होती की या बजेटमध्ये वाढ करता येते की प्रयत्न करण्यात यावा नविन सुधारणा व्हावी. सर्व सामान्याना सोबत घेवून चांगले कामे केले वर्षभर त्यांनी जे काम केले यापूर्वीच्या सभापतीनीही कामे केली व पुढे येणारे सभापती यापेक्षाही चांगली कामे करेल व या महानगरपालिकेला नवीन दिशा मिळेल अशी अपेक्षा बाळगतो.

श्री महेश माळवतकर : मा.सभापती यांनी वर्षभर चांगले काम केले. गेल्या वर्षी मा.सभापती स्थायी समिती यांनी विकास कामाना गती देण्याचे काम केले. प्रत्येक वार्डात जावून नागरीकांच्या भेटी घेवून त्यांच्या समस्या सोडण्याचा प्रयत्न केला व असे काम करणारे हे पहिलेच सभापती आहे. त्यांनी प्रभागात जावून लोकांच्या प्रत्यक्ष तक्रारी ऐकून निवारण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावयास पाहिजे. हे अर्थसंकल्प शहराला पुढे नेणारा व विकासाला गती देणारा आहे.

श्री वसंत नरवडे पाटील: अर्थसंकल्प हा ३१ मार्चच्या आत मंजूर व्हावा. ३१ मार्चच्या आत बजेटला मंजूरी मिळावयास पाहिजे. जेणेकरून एक महिना अभ्यासासाठी मिळेल जी जी कामे राहिली त्यासाठी प्रभागात जावून पाहणी करून कामे करण्याच्या संदर्भात वाद उत्पन्न होणार नाही. उत्पन्नाबाबत खुलासा केलेला आहे. अभ्यासाला वेळ मिळत नाही. १०३ नगरसेवक आहे विकासाच्या कामासाठी येथे आलेले आहे. प्रशासनावर या पदाधिकाऱ्याची पूर्णपणे पकड नाही. पुढच्या वेळी तरी मार्चमध्ये अर्थसंकल्प घेण्यात यावा.

श्री गजानन रामकिसन बारवाल : मा.महापौर व मा.सभापती श्री रेणूकादास वैद्य यांचे प्रथम अभिनंदन. मा.रेणूकादास वैद्य यांनी चांगली कामगिरी केली व कामगीरी करताना प्रशासनावर अंकुश ठेवला ही बाब प्रकर्षाने जाणविली. कोणतेही राजकारण न करता त्यांनी विकासाची कामे केली. चांगल्या पध्दतीने हायलाईट केले. त्यांनी केलेल्या सुधारणा चांगल्या आहे. येणाऱ्या दिवसात त्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावर अभ्यास करून हा अर्थसंकल्प चांगल्या दिशेने घेवून जाईल. पुन्हा एक वेळ त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री भगवान घडमोडे : मा.सभापती यांनी अत्यंत चांगला व जनहिताचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. त्यांनी सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. शहराच्या विकासाला चालना देणारा विकास कामे नजरेसमोर ठेवून हा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. मा.सभापती यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री संतोष खेंडके : स्थायी समितीचे सभापती यांनी सन २००७-२००८ चा अर्थसंकल्प सादर केला. शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून खुप चांगला आहे. सभागृहाच्या वतीने अभिनंदनाचा प्रस्ताव प्रस्तावित करतो.

सौ.लता दलाल : स्थायी समितीचे सभापती यांनी अर्थसंकल्पाच्या संदर्भात संपूर्ण माहिती दिली. त्यांनी चांगले काम केले अर्थसंकल्पात त्यांनी संपूर्ण शहरास न्याय देण्याचा प्रयत्न केला. सर्व वार्डामध्ये कामे होतील अशा पध्दतीने त्यांनी अर्थसंकल्प तयार केले आहे. त्यांनी अत्यंत चांगले अर्थसंकल्प सादर केला त्यांचे हार्दीक अभिनंदन करते आणि त्याबद्दल त्यांना धन्यवाद देते.

मा.महापौर : स्थायी समिती सभापती श्री रेणूकादास वैद्य यांनी वर्षभर अत्यंत चांगले काम केलेले आहे. शहराचा विकास व विविध क्षेत्रामध्ये त्यांनी अत्यंत चांगले काम केलेले आहे व त्यांनी अत्यंत चांगला अर्थसंकल्प सभागृहात सादर केलेला आहे. आपण सर्वांच्या वतीने सभापती श्री रेणूकादास वैद्य यांचे मी अभिनंदन करतो. आणि मी त्यांचा सत्कार करू इच्छितो. अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्यात यावा आणि सदर अर्थसंकल्पात आणखी काही तरतूद किंवा सूचना करावयाच्या असतील त्यासाठी विशेष सर्व साधारण सभा बोलावणार आहोत व त्याची आगावू सूचना दिली जाईल व त्या दिवशी सदर अर्थसंकल्पावर चर्चा करण्यात येईल व आताची सभा तहकुब करण्यात येते.

या बरोबरच सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद